# ओएनजीसी (डब्ल्यूओ) कर्मचारी संघटना

कर्मचारी बंधू भगिनींनो,

आपणा सर्वांना माहित आहेच कि, १९९८ साली मुंबई हायकोर्टाकडून कामगारांना गुप्त मतदान पध्दतीने मान्यताप्राप्त युनियन ठरविण्याचा अधिकार आपल्या युनियनने मिळविल्यानंतर सन १९९८ साली प्रथम निवडणूक मुंबई विभागात पार पाडली. या निवडणूकीत आपण सर्वांनी आम्हांस निवडून दिल्यानंतर सन २००० साली प्रथमच पे रिव्हीजन करण्याचा अधिकार कर्मचारी संघटनेस प्राप्त झाला.

सन २००० साली १९९७ सालासाठी होत असलेल्या पे रिव्हीजनचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात आली की यापूर्वी PEU ने केलेल्या पे रिव्हीजन मध्ये अधिकारी श्रेणी व युनियन श्रेणी मध्ये प्रचंड तफावत दिसून आली. या आर्थिक तफावतीमुळेच कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष होता व त्यामुळेच कर्मचारी संघटनने अधिकारी वर्गाचे पे रिव्हीजन होत नाही तोपर्यंत युनियनचे पे रिव्हीजन न करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. याचा फायदा असा झाला की ३१/१२/१९९६ पूर्वी जे कर्मचारी सेवेत होते त्या सर्व कर्मचारी बांधवांना कमाल आर्थिक फायदे मिळवून देण्यात कर्मचारी संघटना यशस्वी झाली हे सर्वश्रुत आहे.

पे रिव्हीजन वेळी सन १९९६ साली PEU ने Jr. Asst. Tech. ही नविन वेतन श्रेणी तयार करण्यासाठी व्यवस्थापना बरोबर जो करार केला होता त्यानुसार वेतन श्रेणी (A-I) Rs. 4700/- तयार करण्यात आली व याचा कालावधी त्यावेळी **३** वर्षे इतकाच होता. त्यावेळी (A-II) वेतनश्रेणी Rigman पदाकरीता होती व त्याची पात्रता Q3 होती. ह्या वेतन श्रेणी व्यतिरीक्त कोणत्याही प्रकारची नविन वेतन श्रेणी तयार करण्यात आली नव्हती हे आपल्या सुध्दा लक्षात येईल. ह्या करारमध्ये A-II/A-III/A-IV ह्या वेतन श्रेणी फक्त पदोन्नती वेतनश्रेणी म्हणून परिचित होत्या. डिप्लोमा धारकांसाठी (A-V) Rs. 7000/- हि वेतन श्रेणी उपलब्ध होती. दुर्दैवाने सन २००१ साली कर्मचारी संघटना मान्यताप्राप्त युनियन निवडणूकीत पराभूत झाल्यानंतर सन **२००१-२००७** सालापर्यंत PEU मान्यताप्रापाप्त म्हणून कार्यरत होती. PEU ने सन २००४ साली MOU 2004 वर सह्या केल्या त्यावेळी त्यांनी (A-V) Jr. Enggineer हि वेतन श्रेणी बरखास्त करुन ह्या पदासाठी A-II हि नविन वेतनश्रेणी तयार करण्यास ONGC बरोबर करार केला. त्याच बरोबर A-I ह्या वेतन श्रेणीचा पदोन्नतीचा कालावधी २१ वर्षांवरुन २४ वर्षे केला हे आपल्या सर्वांना माहित आहेच. दुर्दैवाने A-II वेतन श्रेणी तयार करीत असताना (A-V) Jr. Enggineer ह्या वेतन श्रेणीचा पदोन्नतीचा कालावधी पूर्वी ४ वर्षे होता तो १८ वर्षे केला. त्याचबरोबर त्यावेळी इतर केंद्रीय आस्थापना मध्ये असलेल्या Jr. Engineer पदासाठी असलेल्या वेतन श्रेणींचा अभ्याससुध्दा न करता आंधळेपणाने म्हणा किंवा इतर सूडभावनेने आपल्या सर्वांची वेतन श्रेणी Rs. 7000/- वरुन Rs. 5100/- आणताना आपले बेसिकमध्ये Rs. 1900 आर्थिक नुकसान PEU ने केले हे स्पष्टपणे दिसत आहे. व त्याची जबाबदारी घ्यायला सुध्दा आजही PEU तयार होत नाही हे दुर्दैव आहे. त्याहीपेक्षा आपण केलेल्या चुकांचे खापर कर्मचारी संघटनेवर टाकण्यासाठी विविध गैर मार्गाचा वापर आजच्या निवडणूकीत सराईतपणे करताना दिसत आहे.

कर्मचारी संघटनेला पुन्हा २००८ साली आपण निवडून दिल्यानंतर २००७-२०१६ या कालावधीसाठी वेतन करारात पुन्हा आपल्या सर्वांना अधिकारी वेतन करारा प्रमाणे सर्व आर्थिक फायदे मिळवून देण्यात कर्मचारी संघटना यशस्वी ठरली. तसेच **१९९७** च्या वेतन करारामध्ये इतर PSU नी आपल्यानंतर वेतन करार करताना अधिक बेसिक घेतल्याने **१/१/१९९७** ते **३१/१२/२००६** या कालावधीत लागलेल्या कर्मचाऱ्यांना तीन व दोन वार्षिक वेतन वृध्दी मिळवून देवून त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यात कर्मचारी संघटना यशस्वी ठरली.

त्याचबरोबर MOU 2004 मध्ये सुधारणा करण्यासाठी कमिटीचे गठन करण्यातही कर्मचारी संघटना यशस्वी झाली. सन २०१४ साली कमिटीचे कामकाज सुरु झाल्यानंतर आज MOU 2004 करारामधील सर्व कामगारांचे नुकसान करणाऱ्या जाचक अटी रद्द करण्यात कर्मचारी संघनेला आपल्या सर्वांच्या पाठिंब्यामुळे यश मिळाले आहे. त्यानुसार A-II या श्रेणीचा प्रमोशन कालावधी १८ वर्षांवरुन १२ वर्षांपर्यंत तसेच A-I श्रेणीचा वाढविलेला तीन वर्षांचा कालावधी पुर्णपणे रद्द करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे A-I (Drilling Rigman) श्रेणीचा कालावधी १८ वर्ष करण्यात येत आहे. हे फार मोठे यश मिळवित असताना कर्मचारी संघटनेने आपल्या सर्वांचा आर्थिक / सामाजिक स्तर उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

मित्रहो, वरील सर्व घडामोडींवरुन PEU सारखी युनियन त्यावेळी मान्यताप्राप्त असताना आपल्या सर्वांचे आर्थिक व सामाजिक नुकसान कसे करीत होती याची आपणास कल्पना आलीच असेल. आज सुध्दा PEU तर्फे धादांत खोटी, निराधार पत्रके काढून आपल्या भावनांशी खेळण्याचा जो प्रयत्न करीत आहे त्या प्रवृत्तीला वेळीच रोखावे लागेल अन्यथा भविष्यात सुध्दा हे असेच करार करुन "काळाची गरज होती" असे खोटे सांगून आपले अजूनही किती व कोणत्या प्रकारचे नुकसान करतील याची खात्री देता येत नाही.

सन २०१७ च्या पे रिव्हीजनमध्ये कर्मचारी संघटना आपल्याला पुन्हा एकदा अधिकारी श्रेणीप्रमाणेच लाभ व आपले सर्व अलाउन्सेस मिळविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेल यात संदेह नाही. आपण सुध्दा या होत असलेल्या मान्यताप्राप्तीसाठीच्या निवडणूकीत "हेलिकॉप्टर" या निशाणीवर शिक्का मारुन भरघोस मतांनी कर्मचारी संघटनेस विजयी कराल हा आम्हास सार्थ विश्वास आहे.

**कामगार एकता झिंदाबाद !**
**कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

**आपला नम्र,**

दि. २/६/२०१८

**प्रदीप मयेकर**
**सरचिटणीस**

## कर्मचारी संघटनेची निशाणी - हेलिकॉप्टर



# हेलिकॉप्टर निशाणीवर शिक्का मारुन कर्मचारी संघटनेस विजयी करा.